# विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुलामुलींच्या सामाजिक परिपक्वतेवर होणारा परिणाम

**डॉ. मालती विश्वनाथ पाटील**
(गृह-अर्थशास्त्र)
तायवाडे महाविद्यालय ,महादुला ,
कोराडी, जि. नागपूर

---

**प्रस्तावना :**

कुटुंब हा एक प्राथमिक सामाजिक समूह होय. संपूर्ण समाजाची उभारणी कुटुंब संस्थेतून झाली आहे. समाजीकरणाची प्रक्रिया कुटुंबातच होत असते. निरनिराळ्या आवश्यक गुणांचा पाया कुटुंबातच घातला जातो. कुटुंब हा व्यक्तीला समाजात कौशल्य शिकविणारा मुख्य घटक आहे. मुलांचा जन्म व त्यांचे संगोपन कुटुंबातच होत असते. आदर्श नागरिक बनण्यास लागणारे सर्व शिक्षण कुटुंबात मुलांना मिळते. मुलांच्या विकासात कुटुंबाचा फार मोठा सहभाग असतो. मुलं कशा प्रकारच्या वातावरणात राहतात. हे त्यांच्या विकासावरून स्पष्ट दिसून येत असते. घरातील कुटुंब पद्धती कोणती आहे.यावर मुलांचे अनुभव व दृष्टिकोन ठरत असतात.

**परिभाषा :**

**(संयुक्त कुटुंब)** या कुटुंब पद्धतीत सहकार्य, सहिष्णुता, त्याग या गुणांची जोपासना होते. त्याचप्रमाणे विविध स्वभावाच्या व वयोगटाच्या व्यक्तींसोबत वेगवेगळ्या पद्धतीने वागण्यास मुलं शिकतात. उत्तम नागरिक होण्यास आवश्यक त्या गुणांचे संवर्धन करण्याचे कार्य संयुक्त कुटुंब पद्धतीत होत असते.

आजच्या आधुनिक युगात अर्थव्यवस्थेत झपाट्याने बदल होत आहे. औद्योगिक क्रांतीमुळे बऱ्याच कुटुंबाने शहराकडे वाटचाल केली. त्यामुळे जुने मोठे कुटुंब कमी होऊन लहान विभक्त कुटुंब अस्तित्वात येऊ लागली.

**(विभक्त कुटुंब)** या कुटुंब पद्धतीत पती-पत्नी आणि त्यांचीच अपत्ये यांचा समावेश असतो. या कुटुंबात मुलांची संख्या कमी असल्यामुळे त्यांच्या संगोपनाची जास्त काळजी घेतली जाते. तसेच मुलांचे सामाजिक संबंध घनिष्ठ असले तरी ते फार मर्यादित राहतात.

मुलांच्या वयानुसार त्यांच्या विकासात बदल होत असतात. लहानपणापासून होत आलेला सामाजिक विकास हा किशोरावस्थेत प्रगत होत असतो. विशिष्ट वयोगटात विशिष्ट प्रकारचे वर्तन मुलांकडून अपेक्षित असते. मुलांचा सामाजिक विकास हा सर्वस्वी तो वावरत असलेल्या सामाजिक वातावरणावर अवलंबून असतो.तसेच समाजात आर्थिक परिस्थितीच्या स्तरावर वागणूक मिळत असते. या वागणुकीचा अनुकूल किंवा प्रतिकूल परिणाम घर ,शाळा व समाज या तीनही क्षेत्रातून होत असतो.

**सामाजिक परिपक्वता :**

किशोर मुलांमुलींमध्ये सामाजिक संबंधातून परिपक्वता येत असते. या वयात दिसून येणारी सामाजिक वागणूक काही प्रमाणात मानसिक परिपक्वतेमुळे विकसित झालेली असते. वयाच्या 12 ते 17 वर्षामध्ये किशोर

मुला मुलींना आपला विकास होत आहे किंवा नाही याची स्पष्ट जाणीव होत असते. शारीरिक दृष्ट्या वयात आल्यानंतर व्यक्ती अल्पकाळातच सामाजिक परिपक्वता प्राप्त करते. समाजामध्ये काही नितीनियम असतात. तसेच लिंगानुसार प्रत्येक व्यक्तीच्या भूमिका ठरलेल्या असतात. जी व्यक्ती समाजाच्या अपेक्षा नुसार वर्तन करते त्यांची सामाजिक परिपक्वता जास्त चांगली होण्यास मदत होते.

प्रस्तुत संशोधनात विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वतेवर परिणाम होतो याबाबत काही **उद्दिष्टे** निश्चित केली ती पुढील प्रमाणे :-

**संशोधनाची उद्दिष्टे:**

1) विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुलामुलींच्या सामाजिक परिपक्वतेचा तुलनात्मक अभ्यास करणे.

2) विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेचा उत्पन्न गटानुसार तुलनात्मक अभ्यास करणे.

**साहित्य अवलोकन :**

**(सामाजिक परिपक्वता)** "सामाजिक संबंधात येणारी परिपक्वता म्हणजे सामाजिक विकास होय." परिपक्व व्यक्तीला आपल्या नागरिकत्वाच्या कर्तव्याची जाणीव असते. अशा व्यक्तीचा स्वत:वर विश्वास असतो व कित्येक बाबतीत ती स्वयंपूर्ण असते. परिपक्व व्यक्तीची आपल्या मित्र-मंडळींबाबतची दृष्टी वास्तविक स्वरूपाची आढळते. त्यात गैरवाजवी भावनोत्कंटता नसते. त्यामुळे समाजाशी समायोजन साधने व्यक्ती शिकते.

**पूर्व संशोधनाचा आढावा :-**

**सामाजिक विकासासंबंधी झालेली संशोधने.**

**लाऊ व रंग (1992)**:- यांच्या प्रस्तुत शोध अध्ययनात किशोरवयीन मुलांच्या सामाजिक विकासात त्यांच्या पालकांशी असलेले संबंध कारणीभूत ठरतात. त्यांनी असे म्हटले आहे की, पालकांशी असलेले चांगले संबंध हे उच्च स्व आदरभाव चायनीज किशोरवयीन मुलांमध्ये आढळले. तरी Aquilino's यांनी या अभ्यासावर भर देऊन असे मत प्रतिपादन केले की, पालक - बालक संबंध मानसिक शारीरिक संबंध हे जास्त महत्त्वाचे आहे. म्हणून स्व-विकासासाठी जरी विरोध असला तरी किशोरवयामध्ये चांगले संबंध असणे महत्त्वाचे असते असे आढळून आले.

**एमीको,एफ.(2001)**:- यांच्या प्रस्तुत शोध अध्ययनात मुलांच्या सामाजिक परिपक्वतेचा अभ्यास करण्यात आलेला आहे. या अध्ययनाचा उद्देश नवीन S.M. सामाजिक परिपक्वता सूची तयार करणे आहे. चाचणीमध्ये 7 ते 8 वर्षाच्या 54 मुलांचा समावेश होता. प्रत्येक स्तराची संख्या ( आठ L 1, नऊ L 3, चार L 4, आठ L 5 , पाच L 51, दोन L 52 )अशा क्रमाने करण्यात आल्या. या मुलांमधील विकासाची पात्रता सामान्य मुलांहून अधिक दिसून येते. क्रमाने विभाजन केल्यावर स्व:दिशा ही प्रथम येते नंतरच सामाजिकीकरण, स्वार्थीपणा चौथ्या क्रमांकावर येते. व्यवसाय हा पाचव्या क्रमांकावर येतो. या वैशिष्ट्यात व सामाजिक परिपक्वता यात महत्त्वपूर्ण फरक आढळून येत नाही. जेव्हा ही Test-Retest या परीक्षणात सामाजिक परिपक्वता यात लक्षणीय फरक दिसून येतो.

कुटुंबाच्या प्रकारानुसार घरातील वातावरणात तसेच बाह्य वातावरणात फरक पडतो. मुलांचे संगोपन, शिक्षण व विकास यावर त्याचा झालेला परिणाम दिसून येत असतो.

**संशोधन पध्दती :**

प्रस्तुत संशोधनात विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींची सामाजिक परिपक्वता यांचा अभ्यास करण्यासाठी ठरवण्यात आलेल्या संशोधन प्रक्रियेमध्ये खालील पायऱ्यांचा समावेश करण्यात आला.

**संशोधन परिवर्त्यांची निवड :**

प्रस्तुत संशोधनात कुटुंबाचा प्रकार, उत्पन्न ही दोन स्वतंत्र परिवर्त्य ( Independent Variable) वापरली आहे. तसेच सामाजिक परिपक्वता या अश्रित परिवर्त्यांचा ( Dependent Variable) उपयोग केला आहे.

**संशोधन क्षेत्राची निवड :**

13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वतेवर कुटुंबाच्या प्रकारचा काय परिणाम होतो. याचा अभ्यास या शहरात सहज शक्य होईल असे वाटल्यामुळे नागपूर शहराची निवड या संशोधनासाठी केली.

**नमुना निवड पद्धती** :

प्रस्तुत संशोधनात नमुना निवडीसाठी संभाव्यता नमुना निवड पद्धती अंतर्गत येणाऱ्या यादृच्छिक आणि स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीचा उपयोग नमुना निवडीसाठी केला.

**नमुना निवड** :

नागपूर शहरातील पूर्व, पश्चिम, उत्तर, दक्षिण व मध्य अशा पाच विभागात असलेल्या प्रत्येक विभागातून 6 शाळांची यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने निवड केली. तसेच 6 शाळांमधून स्तरीय यादृच्छिक नमुना निवड पद्धतीने 50% मुले व 50 टक्के मुली यांची निवड केली.

**नमुन्याचा आकार** :

प्रस्तुत संशोधनासाठी नागपूर शहर विभागातून 30 शाळांची निवड केली. त्यापैकी 17 शाळांमधून प्रत्येकी 24 मुलं-मुली तसेच 13 शाळांमधून प्रत्येकी 22 मुलं मुली. संयुक्त कुटुंबातील 121 मुलं व 121 मुली तर विभक्त कुटुंबातील 230 मुलं व 222 मुलीं अशा एकूण 694 मुला मुलींची नमुना म्हणून निवड केली.

**तथ्य संकलन पद्धती, साधने व तंत्रे** :

विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींची सामाजिक परिपक्वता किती स्पष्ट आहे, त्यात काय फरक आहे, हे तपासून पाहण्यासाठी अनुमापन तंत्राच्या मदतीने तथ्य संकलन करण्याच्या पद्धतीची निवड केली. प्रस्तुत संशोधनात तीव्रता मापक अनुमापांचा उपयोग केला.

तसेच 13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींची सामाजिक परिपक्वता तपासून पाहण्यासाठी खालील अनुमापन तंत्राचा उपयोग केला.

(I) **सामाजिक परिपक्वता चाचणी -** Social Maturity Scale ( S M S) Dr. R. P. Shrivastava

**विश्वसनीयता व वैधता (विश्वसनीयता)** :

सामाजिक परिपक्वता चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी ( Split half Method ) चाचणी दोन भागात विभागण्याच्या पद्धतीचा उपयोग केला. याचा सहसंबंध गुणांक .74 इतका आला. या चाचणीची विश्वसनीयता तपासण्यासाठी वापरलेल्या पद्धतीचे निकाल समाधानकारक असल्यामुळे त्यांचाच उपयोग माहितीचे संकलन करण्याकरिता केला.

**वैधता** :

डॉ. आर. पी. श्रीवास्तव यांच्या सामाजिक ( Social Maturity Scale ( S M S) चाचणीचा प्रस्थापित सहसंबंध गुणांक .92 होता. त्यांच्या तुलनेत घेतलेल्या सामाजिक परिपकतेच्या चाचणीचा गुणांक .80 इतका होता. या चाचणीची वैधता तपासण्यासाठी वापरलेल्या चाचणीचे निकाल समाधानकारक असल्यामुळे त्यांचा उपयोग केला.

**अनुमापन तंत्राचा उपयोग व मापन तंत्रे** :

सामाजिक परिपक्वता या चाचणीमापनासाठी शाळेतील प्रमुख अधिकाऱ्यांची परवानगी घेतली. शाळेतील निवडलेल्या मुला मुलींना सामाजिक परिपकता चाचणीतील प्रश्नावली विषयी माहिती देण्यात आली. व कमीत कमी वेळात प्रश्नावली सोडवण्यास सांगितले तसेच सर्व प्रश्न काळजीपूर्वक सोडून घेतले.

विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींकडून सामाजिक परिपकता याबद्दलची चाचणी भरून घेतल्यानंतर चाचणीच्या माहितीपत्रकात स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांचे गुणांकन केले. मिळालेल्या गुणांकाची सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहण्यासाठी योग्य त्या सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

**तथ्यांचे वर्गीकरण, सारणीकरण** :

प्रस्तुत संशोधनासाठी जी तथ्ये संकलित केली ती संशोधनाच्या उद्दिष्टांनुसार कुटुंबाचा प्रकार आणि उत्पन्न मर्यादा प्रमाणे वर्गीकृत करण्यात आली. वर्गीकृत तथ्यांचे योग्य प्रकारे सारणीकरण करण्यात आले.

**सांख्यिकीय पद्धतीची निवड** :

13 ते 17 वर्ष वयोगटातील मुला मुलींची सर्वसाधारण माहिती तसेच सामाजिक परिपक्वता या चाचणीचा उपयोग करून माहिती गोळा करण्यात आली.

कुटुंबाच्या प्रकाराचा तसेच उत्पन्न गटाचा मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेवर होणारा परिणाम स्पष्ट करण्यासाठी व त्यांची सांख्यिकीय सार्थकता तपासण्यासाठी खालील सांख्यिकीय पद्धतीचा उपयोग केला.

**1. व्दिमार्गीय** ANOVA पद्धती ( प्रचरण विश्लेषण पद्धती ( 'F'Test )

विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपकतेचे सांख्यिकीय विश्लेषण करण्यासाठी व्दिमार्गीय (Two way ANOVA) परीक्षा पद्धतीचा उपयोग केला.

**2. टी परीक्षा पद्धती** ( 't' test ) यामध्ये समग्राचा अधिक सखोल अभ्यास करण्यासाठी तथ्यांचे उत्पन्नानुसार वर्गीकरण करून त्यांची सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहण्यासाठी 't' test या सांख्यिकीय परीक्षा पद्धतीचा उपयोग केला या पद्धतीने विभक्त व संयुक्त कुटुंबातील मुला-मुलींची उत्पन्नानुसार सांख्यिकीय सार्थकता तपासून पाहिली.

**गृहीतकृत्य** :

संशोधन विषयासंबंधी असणाऱ्या पूर्व ज्ञानाच्या आधारे तसेच या विषयाच्या विविध पैलूंच्या केलेल्या अभ्यासाच्या आधारे काही **गृहितकृत्य** निश्चित केलेली आहेत ती खालील प्रमाणे

1) विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेत अंतर नसते.

2) विविध उत्पन्न गटानुसार 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेत अंतर नसते.

3) कुटुंबाचा प्रकार (विभक्त आणि संयुक्त) आणि उत्पन्न गट यांच्या संयुक्त गटामध्ये 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेत अंतर नसते.

**सांख्यिकीय विश्लेषण व अनुमान :**

संशोधनाचे निकाल आणि त्यांचे सांख्यिकीय विश्लेषण पुढील भागात विभागले गेले. सर्वसाधारण माहितीत विभक्त व संयुक्त कुटुंबाचे प्रमाण व कुटुंबाचे उत्पन्न या बद्दलची माहिती वर्णनात्मक सांख्यिकीय पध्दतीने माध्य/टक्केवारी काढून प्रस्तुत केली.

**मुला मुलींची कुटुंबाच्या प्रकारानुसार विभागणी :**

| **कुटुंबाचा प्रकार** | **संख्या** | **टक्केवारी** |
|---|---|---|
| विभक्त कुटुंब | 452 | 65% |
| संयुक्त कुटुंब | 242 | 35% |
| एकूण | 694 | 100% |

वरिल सारणीवरून असे स्पष्ट होते की, बदलत्या परिस्थितीनुसार हल्ली विभक्त कुटुंब पध्दती जास्त प्रचलित झालेली आहे. त्यामुळे संयुक्त कुटुंबाच्या तुलनेत विभक्त कुटुंबाची संख्या जास्त आली.

**उत्पन्नानुसार कुटुंबाची विभागणी :**

| उत्पन्न गट | कुटुंबाचा प्रकार | | | |
|---|---|---|---|---|
| | विभक्त कुटुंब | | संयुक्त कुटुंब | |
| | संख्या | प्र.श. | संख्या | प्र.श. |
| निम्न 0-5, 000 | 41 | (9.07%) | 20 | (8.26%) |
| निम्न मध्यम 5,001 -10,500 | 159 | (35.18%) | 79 | (32.65%) |
| उच्च मध्यम 10,501-15,000 | 213 | (47.12%) | 122 | (50.41%) |
| उच्च 15001 च्या वर | 39 | (8.63%) | 21 | (8.68%) |
| एकूण | 452 | (100%) | 242 | (100%) |

(MHADA) संस्थेच्या उत्पन्न गटाच्या वर्गीकरण केले. वरील सारणीप्रमाणे कुटुंबाच्या उत्पन्नाचे चार उत्पन्न गट तयार करून त्याप्रमाणे कुटुंबाचे वर्गीकरण केले.

निम्न उत्पन्न गट, निम्न मध्यम उत्पन्न गट तसेच उच्च मध्यम उत्पन्न गट या तीनही गटातील संयुक्त कुटुंबातील मुलामुलींची सामाजिक परिपक्वता विभक्त कुटुंबातील मुलामुलींच्या सामाजिक परिपक्वते पेक्षा अधिक स्पष्ट असते. तर उच्च उत्पन्न गटात विभक्त व संयुक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वतेत फरक नसतो.

**निष्कर्ष आणि चर्चा :**

1) विभक्त व संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वते फरक असतो. संयुक्त कुटुंबातील मुला मुलींची सामाजिक परिपक्वता विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वतेपेक्षा अधिक स्पष्ट असते.

2) विविध उत्पन्न गटात 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेमध्ये फरक असतो.

3) कुटुंबाचा प्रकार ( विभक्त व संयुक्त) आणि उत्पन्न गट यांच्या संयुक्त गटात 13 ते 17 वयोगटातील मुला मुलींच्या सामाजिक परिपक्वतेमध्ये फरक असतो.

संयुक्त कुटुंबातील 13 ते 17 वयोगटातील मुला-मुलींची सामाजिक परिपक्वता विभक्त कुटुंबातील मुला-मुलींच्या सामाजिक परिपक्वते पेक्षा अधिक स्पष्ट असते.

आई-वडिलांच्या आर्थिक स्तराचा परिणाम मुलामुलींच्या सामाजिक विकासावर होत असतो. आर्थिक स्तर उच्च दर्गाच्या असल्यास मुलामुलींना विविध व्यक्तींमध्ये मिसळण्याची संधी प्राप्त होते. त्याचप्रमाणे चांगला श्रेणीच्या शाळेत शिक्षण घेतल्यास त्या मुलांमुलींचा सामाजिक विकास चांगला होतो .

**शिफारसी / सूचना :**

1) पालकांनी रितीरिवाज ,परंपरा हे सामाजिक स्वास्थ्य टिकवून ठेवण्यासाठी कसे पोषक आहेत. हे मुला मुलींना पटवून द्यावे.

2) सामाजिक कौशल्य, जीवनमूल्य आचरणात आणण्यासाठी विधायक कार्ये करण्यास मुला-मुलींना प्रेरित केले पाहिजे.

3) कुटुंबातील व्यक्तींनी तसेच शिक्षकांनी मुला-मुलींना समाजाच्या व्यवहाराच्या चौकटीतच आदर्श जीवन जगण्याचे मार्गदर्शन करावे.

4) कुटुंबातील वातावरण खेळीमेळीचे, प्रेमाचे असावे, त्यामुळे मुला मुलींचा सामाजिक ,भावनिक ,नैतिक , बौद्धिक विकास उत्तम होण्यास मदत होईल.

5) पालकांनी आपल्या पाल्यांना प्रोत्साहन देऊन विविध संधी उपलब्ध करून द्याव्यात व बदलत्या काळाकडे लक्ष ठेवून त्यांच्याशी मैत्रीपूर्ण सुसंवाद साधावा.

**संदर्भ सूची :**


- प्रा. कुसुम जुनूनकर-- मातृत्व आणि बाल संगोपन
- प्रा.जयश्री नांदे, डॉ. चं. पांडे -- मानवी विकास व समायोजन
- डॉ. त्रिवेणी फरकाडे, सौ सुलभा गोंगे -- विवाह आणि कौटुंबिक संबंध
- सौ. सुधाताई काळदाते -- पारंपारिक आणि आधुनिक भारत
- डॉ. भा.कि. खडसे -- समाजशास्त्राची मूलतत्त्वे
- सौ. सुमेधा लेले, सौ.मनिष अष्टपुत्रे -- बालविकास
- नलिनी चंदावसकर --किशोरावस्था

- डॉ.स.अ.केळकर-- बाल मनोविकास
- डॉ.मिनाक्षी तारणेकर-- बालविकास आणि बाल संगोपन
- प्रा.सौ. सुमन पाटे-- समाजशास्त्राची रूपरेषा
- प्रा.व्ही. के. जोशी , प्रा.जे. पी. करवा --सुलभ समाजशास्त्र
- प्रा. वसंत वैद्य -- समाजशास्त्र समस्या
- प्रा. सुषमा जोशी, चं.ग. पांडे-- बालविकासाची मूलतत्त्वे
- प्रा. वि.दि. तडसरे --मानसशास्त्र
- सौ. नलिनी वराडपांडे -- बालविकास
- सुधीर बोधनकर ,प्रा. विवेक अलोणी -- सामाजिक संशोधन पद्धती
- यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ नाशिक (1994) --संशोधन पद्धती
- प्रा.ना.घाटोळे --सामाजिक शास्त्र आणि संशोधन, समाजशास्त्रीय संशोधन तत्व आणि पद्धती
- lau, S. and leung, k. British journal of educational psychology 62.
- Emiko F. journal of Japanese association of occupational therapists vol. 20 no.5,2001.
- W.J. Goode and p.k .hatt -- Methods in social research
- Dr. R.P. Srivastava -- Social Maturity Scale (SMS ) manual

**परिशिष्टे :**

- कौटुंबिक सर्वसाधारण माहिती प्रश्नावली.
- Social Maturity Scale ( S.M.S) Dr. R.P. Srivastava Jabalpur( M.P.)
- नागपूर शहरातील पूर्व ,पश्चिम,मध्य, उत्तर, दक्षिण भागातील यादृच्छिक पद्धतीने निवडलेल्या शाळा